नि.फौ.प्र.क्र.६५/२०२५
सरकार/करण व १
निशाणी – २१

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नाव: मनोज खुशाल नागपुरे,
वयः ३१ वर्षे, व्यवसायः शेती,
निवासस्थान: आझाद वॉर्ड, चिमूर, ता. चिमुर, जि. चंद्रपुर.

**<u>शपथेवर सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. व्ही. गंधारे यांच्यामार्फत</u>**

मी आरोपींना ओळखतो. ते माझ्या वॉर्डातले आहेत. घटना अंदाजे एक वर्षापुर्वी रात्री १०.०० वाजताच्या पिसे पेट्रोल पंप येथे घडली होती. त्यावेळी माझा व आरोपींचा तोंडी वाद झाला होता. या व्यतिरिक्त आणखी काहीही घडले नव्हते. म्हणुन रागाच्या भरात मी तक्रार दिली होती. आता मला अभिलेखावरील तोंडी तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. म्हणुन त्यास **नि.क्र.२२** देण्यात आले. आता मला अभिलेखावरील छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. म्हणुन त्यास **नि.क्र.२३** देण्यात आले.

**(साक्षीदार हा सरकारपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे विद्वान सहायक सरकारी वकिलांनी उलटतपासनीच्या अनुशंघाने प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर.)**

०२. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी आरोपींनी माझ्याशी वाद घालुन स्टीलच्या कडयाने माझ्या डोक्यावर मारहाण केली होती. आता मला माझ्या तक्रारीमधील व बयाणामधील अधोरेखांकीत भाग ‘अ’ दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगीतला नव्हता. तो पोलीसांनी माझ्या तक्रारीमध्ये व बयाणामध्ये का नमुद केला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत माझी न्यायालयाच्या बाहेर तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपींना वाचविण्यासाठी मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री. एस. टी. नन्नावरे यांच्यामार्फत</u>**

०३. नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – चिमूर
दिनांक – २१/०४/२०२६

(आर.डी. भुयारकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर